● शनिवार, दि. १८ जानेवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १७१ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ MAHMAR/2013/50827

## येत्या तीस दिवसात ‘ते’ वीजेचे खांब अन् रोहित्रे हटवा

### अधिक्षक अभियंता, आयुक्तांना नोटीस; अन्यथा सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करणार - ॲड. ईश्वर बिल्होरे

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील रस्त्यांवर मधोमध असलेले विद्युत खांब व रोहित्रांमुळे होणाऱ्या वारंवार अपघातांच्या पार्श्वभूमीवर हिंदू महासभेचे देवगिरी प्रांत प्रमुख ॲड. ईश्वर शिवाजीराव बिल्होरे यांनी महावितरण कंपनीचे अधिक्षक अभियंता प्रभाकर सरक व महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांना कायदेशीर नोटीस पाठवली आहे. ३० दिवसांच्या आत विद्युत खांब व रोहित्र रस्त्याच्या बाजूला हलवण्याची मागणी केली आहे. अन्यथा, भविष्यातील अपघातांसाठी संबंधित अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

यासंदर्भात उभय अधिकाऱ्यांना पाठवलेल्या आरपीडीए कायदेशीर नोटीसमध्ये ॲड. बिल्होरे यांनी रस्त्याच्या विकासकामांमधील निष्काळजीपणा, अपघातांची जबाबदारी, विकासाच्या नावाखाली भेदभाव, नागरिकांच्या जीवितास धोका आदी मुद्द्यांकडे लक्ष वेधले आहे. जालना शहरात सिमेंट रस्त्यांचे विकासकाम सुरू असताना विद्युत खांब व रोहित्र रस्त्याच्या मध्यभागीच सोडून दिल्याने रहदारीस मोठा अडथळा निर्माण झाला आहे. हे खांब रस्त्याच्या कडेने हलवले गेले नाहीत, ज्यामुळे अपघातांच्या घटना पान २ वर



## शिक्षकांचे सक्षमीकरण; नऊ जण तज्ञ मार्गदर्शक म्हणून नियुक्त

### डायटचे प्राचार्य डॉ राजेंद्र कांबळे यांची माहिती

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** राज्यातील प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांचे सक्षमीकरण करण्यासाठी राज्यभरात प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षकांचे सक्षमीकरण करणे गरजेचे आहे. सध्या राज्यामध्ये नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रमाची अंमलबजावणी सुरू आहे. त्याच अनुषंगाने शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षक. त्या शिक्षकांची सक्षमीकरण झाले पाहिजे. शिक्षकांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. तसेच प्रत्येक शिक्षकांचे ५० तासांचे प्रशिक्षण झालेच पाहिजे या सदराखाली सुद्धा शिक्षकांचे गुणवत्ता पान २ वर

## राज्य लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी - आयुक्त डॉ. किरण जाधव

**जालना । प्रतिनिधी -** नागरिकांना पारदर्शकपणे व दिलेल्या विहित कालावधीमध्ये सेवा मिळावी तसेच त्यांच्या हक्काची जाणीव करुन देण्याच्या उद्देशाने हा राज्य लोकसेवा हक्क कायदा लागू करण्यात आला आहे. या कायद्याच्या माध्यमातून प्रशासनाने नागरिकांच्या दारात पोहोचून विहित कालमर्यादेत शासकीय विभागांच्या अधिसूचित सेवा मिळविण्यासोबतच, शासनाची प्रतिमा उंचाविण्यासाठी या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आवाहन राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात राज्य लोकसेवा हक्क कायदा अंमलबजावणीबाबतच्या आढावा बैठकीत म ार्गदर्शन करतांना डॉ. किरण जाधव बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, उपजिल्हाधिकारी (सा.) नम्रता चाटे, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, कक्ष अधिकारी संजीव शिंदे, जिल्हा प्रकल्प प्रमुख प्रल्हाद तारख आदींची पान २ वर

युवा आदर्श

### परिषद ...

येणार येणारं नवीन
परदेशातले रे पाहुणे
सर्वांना इतकेचं काम
व्यवस्था नीट पाहणे
तात्पुरत्या डागडुज्या
गावाची कात टाकणे
पोलीसां दिली तंबी
ती सुव्यवस्था राखणे
नको निषेध निदर्शने
काळे झेंडे दाखवणे
कलमे लावा हवी ती
नतद्रष्ट वेळे पकडणे
आण रेडीमेड झुडपी
हिरवी झाडी लावणे
मेकअप असा मस्त
रे नवरी गोरटी दावणे
काम आपले एकचि
दिसेल ते ते विकणे
आरशात पहावे नीट
हाताची दिसे काकणे
नाव घेऊन परिषदेचे
उदरे आपलीचं भरणे
नाव ठेवून दुसऱ्यांना
बा राजकारण करणे

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.



## संपादकीय

### चीनचा खोडसाळपणा

भारताचा शेजारी असणारा पण भारताला कायम पाण्यात पाहणारा चीन सतत काही ना काही खोड्या काढून दोन्ही देशातील तणाव कायम वाढवत असतो. हे आताच नाही तर १९६२ पासून चालू आहे. १९६२ साली भारताशी मैत्रीचा हात पुढे करून हिंदी चिनी भाई भाई म्हणत त्याने भारताचा केसाने गळा कापला. त्यानंतरही त्याने भारताच्या सतत खोड्या काढून भारताला त्रास दिला. कधी त्याने भारतात घुसखोरी केली तर कधी त्याने सीमेवर नवीन गावे वसवली तर कधी भारतातील गावांना चिनी नावे देऊन ती गावे चीनच्या हद्दीत असल्याचा दावा केला अर्थात चीनच्या या दाव्याला किंवा खोडसाळपणाला भारताने कधी भीक घातली नाही तरीही त्यांचा खोडसाळपणा कमी झाला नाही उलट वाढतच गेला. मागील वर्षी चीनने भारतातील लडाख आणि अरुणाचल प्रदेशातील काही गावांना चीनच्या नकाशात दाखवले होते. या नकाशात त्याने भारतातील लडाख आणि अरुणाचल प्रदेशातील काही गावांना चीनमध्ये दाखवले इतकेच नाही तर त्या गावांना चिनी नावे देखील दिली होती. चीनच्या या खोडसाळपणाची भारताने तातडीने दखल घेऊन त्याचा निषेध केला होता. भारताच्या निषेधानंतरही चीन भारताच्या खोड्या बंद करत नाही हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे यावेळी चीनने भारताच्या लडाखमध्ये दोन नव्या काऊंट्याची घोषणा करत घुसखोरी केली. पंधरा दिवसापूर्वीच भारताच्या हे लक्षात आले भारतीय लष्कराने आणि परराष्ट्र मंत्रालयाने याचा चीनला जाब विचारला आहे. चीन एवढ्या वरच थांबला नसून चीनने आता भारताशी वॉटर वार सुरू केले असून चीनने ब्रह्मपुत्रा नदीवर मोठा जल प्रकल्प सुरू केला आहे या जल प्रकल्पामुळे भारताला भविष्यात मोठ्या जल संकटाला सामोरे जावे लागणार आहे . दुसऱ्यांच्या खोड्या काढून गंमत पाहण्याची चीनची जुनी खोड आहे. अशी खोड तो फक्त भारताचीच काढतो असे नाही तर इतर देशांचीही काढतो मात्र आशिया खंडातील विशेषतः भारताच्या शेजारील काही देशांना त्याने वारेमाप कर्ज देऊन तर काही देशांना धाक दाखवून गप्प बसवले आहे. भारत मात्र त्याच्या या खेळीला बळी पडत नाही म्हणूनच तो अशा खोड्या अधून मधून काढत असतो. भारताच्या अरुणाचल प्रदेश आणि लडाखवर चीनचा डोळा आहे इतकेच नाही तर अरुणाचल प्रदेश हा आपलाच भूभाग असल्याचा दावा चीनने अनेकदा केला आहे. मागील वर्षी चीनच्या झाऊझंग येथे पार पडलेल्या क्रीडा स्पर्धेत भारताने खेळण्यास नकार दिला त्यावेळी चीनने अरुणाचल प्रदेशातील खेळाडूंना स्टेपल व्हिसा दिला होता. स्टेपल व्हिसा देऊन त्यांनी एकप्रकारे भारताला डिवचले होते. त्या आधी लडाखमध्ये चिनी सैन्य घुसवले होते तेंव्हा दोन्ही देशातील सैन्य एकमेकांपुढे उभे ठाकले होते केंव्हाही युद्धास तोंड फुटेल अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी झालेल्या धुमश्चक्री नंतर चिनी सैन्य भारताच्या हद्दीतून निघून गेले होते. मात्र सीमेवर त्यांच्या हालचाली कायम चालू असतात. मुळात चीन हा जगातला सर्वात कपटी देश आहे. चीनला जगातील महासत्ता व्हायचं आहे त्यासाठी त्याने विस्तारवादी भूमिका स्वीकारली आहे त्यामुळेच तो शेजारील देशांची जमीन आणि मालमत्ता बळकावीत आहे. त्यांच्या या विस्तारवादी धोरणाला जर कोणी आडकाठी आणणार असेल तर तो भारत आहे हे चीन जाणून आहे म्हणूनच तो भारताच्या अशा अधूनमधून खोड्या काढून भारताला त्रास देत असतो अर्थात त्याच्या या खोड्यांना भारत आता बधणार नाही कारण आजचा भारत हा १९६२ चा भारत नसून २०२५ चा भारत आहे. चीनच्या आरे ला कारे करण्याची हिंमत या भारतात आहे त्यामुळेच भारताशी थेट पंगा न घेता अशा छोट्या मोठ्या खोड्या काढून भारताला त्रास देण्याचे धोरण चीनने अवलंबले आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# जालना येथील ड्रायपोर्ट कार्यान्वित करण्याच्या कामांना वेग

## मार्च-२०२५ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता

**जालना । प्रतिनिधी -** जालना येथे जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (JNP-) आणि नॅशनल हायवे लॉजिस्टिक मॅनेजमेंट लिमिटेड (NHLML) संयुक्तपणे SPV नागपूर MMLP लिमिटेड यांच्यामार्फत जालना येथे मल्टी मॉडेल लॉजिस्टिक पार्क (ड्रायपोर्ट) (MMLP) प्रकल्प विकसित करण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने आज जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी लॉजिस्टिक पार्कच्या विकास कामांच्या प्रगतीचा आढावा घेतला.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी जालना येथे उभारण्यात येणाऱ्या मल्टी मॉडेल लॉजिस्टिक पार्क (MMLP) प्रकल्पास विकसित करुन प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक जमीन भाडेतत्वावर आणि नोंदणी विषयक प्रश्न सुलभरित्या सोडवून या कामांना गती देण्याच्या जालना उपविभागीय अधिकारी, जालना तहसिलदार आणि नोंदणी व मुद्रांक विभाग यांना सूचना दिल्या. तसेच मल्टी मॉडेल लॉजिस्टिक पार्क (ड्रायपोर्ट) मार्च-२०२५ पर्यंत कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने सर्व हलचलीना गती देण्यात यावी. यासाठी केंद्रस्तरावरुन आणि जिल्हा प्रशासनाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.


यावेळी बैठकीस नॅशनल हायवे लॉजिस्टिक मॅनेजमेंट



लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रकाश गौर, विभागीय अधिकारी रविंद्र गुप्ता, नागपूर मल्टी मॉडेल लॉजिस्टिक पार्क प्रा. लिमिटडचे सह सल्लागार अदरीजीत बिस्वास, प्रकल्प व्यवस्थापक विकास मलीक, कॉनकोरचे सहायक अधिकारी शिरीष तळेले, जालना तहसिलदार छाया पवार यांची उपस्थिती होती.

# पोलीस उपनिरीक्षक परिक्षेत रोहित काळे उत्तीर्ण

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर येथील विनायक आप्पा काळे यांचे पुतणे रोहित बाळासाहेब काळे यांची पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झाल्याबद्दल रोहित काळे या विद्यार्थ्याचा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपील आकात यांनी मंगळवारी यथोचित केला. रोहित काळे याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात



आलेल्या पोलिस उपनिरिक्षक निवड चाचणी परीक्षा दिली होती. या परीक्षेत तो चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाला आहे.या यशाबद्दल राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जालना जिल्हाध्यक्ष कपिल आकात यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.यावेळी माजी नगराध्यक्ष विनायक काळे,नगरसेवक विजय नाना राखे,सय्यद आरेफ अली,कदिर भाई कुरेशी,नासेर चाऊस,संजय राऊत,युवकचे शहराध्यक्ष राजेश तेलगड यांची उपस्थिती होती.

## तिसऱ्या दिवशीही अतिक्रमण हटाव मोहिम सुरुच

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेतर्फे शुक्रवार ( दि. १७) रोजी शहरातील वाढलेले अतिक्रमण काढणेकरिता मोहिम राबविली असून अतिक्रमण हटाव मोहिमेचा आजचा तिसरा दिवस होता. शुक्रवार रोजी शहरातील वाळकेश्वर मंदिर ते जय नगरपर्यंत रहदारीस अडथळा निर्माण करणारे आरसीसी वॉल कंपाऊंड, आरसीसी दुकाने असे एकूण ०८-१० अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली.

ही अतिक्रमण काढणेकरिता स्वच्छता विभागाचे विभाग प्रमुख पंडित पवार, अशोक लोंढे, सतीश पाजगे, विलास गावंडे, हरीहर चांदोडे, निलेश शंकरपेल्ली, शोएब खान, अरुण वानखेडे, रविंद्र कल्याणी, राधेश्याम लोखंडे अधिनस्त जवान, सफाई कर्मचारी वाहन व्यवस्थासह उपस्थित होते.

शहरात मोहीम निरंतर चालू राहणार असून अतिक्रमण क्षेत्र स्वतः काढून घ्यावे, असे आवाहन महानगरपालिकेने केले आहे.

# जालना महापालिकेच्या विरोधात महिलांचा रास्ता रोको

**जालना । प्रतिनिधी -** शहर महानगर पालिकेच्यावतीने गेल्या दोन दिवसांपासून शहरातील नुतन वसाहत भागातील डीपी रोडवरील अतिक्रमण हटाव मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या विरोधात या भागातील महिलांनी आक्रमक पावित्रा घेतला असून अतिक्रमण मोहिम हटाव विरोधात रास्ता रोको आंदोलन केले आहे.

नूतन वसाहत भागातील भीमराव प्रवेशद्वार जवळ हे आंदोलन करण्यात आहे.

शहर महानगर पालिकेने अतिक्रमण हटाव मोहिम दरम्यान अनेकांच्या घरावर जेसीबी चालवले त्यामुळे संतप्त महिला रस्त्यावर उतरल्या. जालना शहर महानगर पालिककेच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी यावेळी करण्यात आली.

जालना महानगरपालिकेने अतिक्रमण हटाव मोहिमेत म्हणून सर्व सामन्यांची घरे तोडू नये अशी मागणी जालना शहरातील नूतन वसाहत भागातील नागरिकांनी केली आहे. यावेळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.



## लोकशाही दिनी तहसीलदार जोंधळे यांचे उपस्थित राहण्याचे आवाहन

**मंठा -** तालुका स्तरावर नागरीकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिन आयोजीत करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने मंठा तालुक्यातील सर्व विभाग प्रमुख कर्मचारी तहसील कार्यालय मंठा येथे उपस्थित राहुन नागरीकांच्या तक्रारीची नोंद घेवुन त्यांचे निराकरण करणार आहेत. त्या अनुषंगाने सोमवार (दि २०) दुपारी १२ वा. नागरीकांनी लोकशाही दिनासाठी तहसिल कार्यालय मंठा येथे उपस्थित राहावे.

# २४ जानेवारीपासून निरंकारी संत समागमात मानवतेचा महासंगम

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्राचा ५८वा निरंकारी संत समागम सुरु होण्यास अवघे काही दिवस उरले असल्याने समागमाच्या पूर्वतयारीमध्ये लागलेले निरंकारी भाविक भक्तगण समागम स्थळ समतल व सुंदर बनविण्यासाठी त्यामधील प्रत्येक व्यवस्थेला अंतिम रुप देत आहेत. समागमाच्या पूर्वतयारीमध्ये पुणे झोनसह संपूर्ण महाराष्ट्रातील हजारो सेवादल स्वयंसेवक आणि भाविक भक्तगण सातत्याने आपल्या निष्काम सेवा अर्पण करत आहेत. पिंपरीतील मिलिटरी डेअरी फार्मच्या सुमारे ४०० एकरच्या विस्तीर्ण मैदानात शुक्रवार, दि.२४ जानेवारी २०२५ पासून हा तीन दिवसीय संत समागम सुरू होत असून, त्याची सांगता २६ जानेवारी २०२५ रोजी होणार आहे. मुख्य सत्संग कार्यक्रम दररोज दुपारी २ वाजता सुरू होईल ज्यामध्ये अनेक वक्ते, गीतकार, कवी सद्गुरु आणि ईश्वराप्रती आपल्या मनातील भावना व्यक्त करतील. शेवटी रात्री ८ वाजल्यापासून सर्वांना सद्गुरु माता सुदीक्षा जी महाराज यांचा पवित्र आशीर्वाद लाभणार आहे.

मागील एक महिन्यांपासून महाराष्ट्रा व्यतिरिक्त इतर राज्यांतून निरंकारी भक्तगणांनी समागम स्थळांवर येऊन आपल्या निष्काम सेवांच्या माध्यमातून समागम स्थळाला एका सुंदर नगरीच्या रुपात परिवर्तित केले आहे. सर्व श्रद्धाळू ज्या उत्साहाने, आवडीने, भक्तिभावाने, मर्यादा व अनुशासनाचे पालन करत आपल्या सेवा निभावत आहेत ते पाहून जनसामान्य अत्यंत प्रभावित आहेत. समागम स्थळाचे हे अनुपम दृश्य आजूबाजूने जाणार्या वाटसरूंना आणि स्थानिक नागरिकांना आकर्षण व उत्सुकतेचे केंद्र बनून राहिले आहे.

मानवतेच्या कल्याणासाठी आयोजित केलेल्या या संत समागमाचे साक्षी बनण्यासाठी समस्त भाविकांना व निरंकारी भक्तगणांना नुक्कड नाटक, बॅनर तसेच पुण्याच्या कानाकोपर्यात खुल्या प्रांगणांमध्ये सत्संगच्या माध्यमातून सादर आमंत्रित केले जात आहे ज्यायोगे त्यांनी या संत समागमामध्ये सहभागी होऊन आपले जीवन सार्थक करावे.

समागमात सहभागी होणार्या सर्व भक्तगणांसाठी व्यापक स्तरावर निवासी तंबू, लंगर, कॅन्टीन, दवाखाने, सुरक्षा व्यवस्था, पार्किंग आणि रेल्वे स्थानक आणि बसस्थानकातून ये-जा करण्यासाठी वाहतूक व्यवस्था इत्यादीची यथोचित व्यवस्था करण्यात आली आहे.



समागम स्थळावर स्वच्छतेची विशेष काळजी घेतली जात आहे. प्रकाशन विभागाकडून समागम स्थळावर वेगवेगळ्या ठिकाणी स्टॉल लावले जात आहेत. संत निरंकारी मिशनचे सचित्र दर्शन घडविण्यासाठी आकर्षक निरंकारी प्रदर्शनीचेही आयोजन केले जात आहे यासह एकूण आठ कार्यशाळा असलेली भव्य बाल प्रदर्शनी देखील असेल, प्रत्येक कार्यशाळा मुलांना आकर्षक आणि शैक्षणिक अनुभव प्रदान करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. हे सर्व सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या पावन मार्गदर्शनानेच शक्य झाले आहे.

भक्तिभावाने केल्या गेलेल्या या सर्व पूर्वतयारीमध्ये कुशलतेची एक सुंदर झलक पहायला मिळत आहे.

निश्चितच या संत समागमामध्ये देश-विदेशातील विविधतेने नटलेल्या संस्कृतीची व सार्वभौमत्वाची छटा उमटलेली पहायला मिळेल आणि यामध्ये सहभागी होणारे समस्त भाविक भक्तगण अलौकिक आनंदाची प्राप्ती करत सद्गुरु व संतांच्या दिव्य वाणीने प्रभावित होऊन आपल्या जीवनाच्या मूळ उद्देशाकडे अग्रेसर होत प्रेमाभक्तीच्या भावनेचा विस्तार करतील.

मानवतेच्या या महामेळाव्यासाठी प्रत्येक धर्मप्रेमी बंधू भगिनींना आदरपूर्वक आमंत्रित करण्यात येत आहे.

पान १ वरुन

### येत्या तीस दिवसांत ...

वाढल्या आहेत. शहरातील विद्युत खांबांमुळे झालेले अपघात हे प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे परिणाम आहेत. अनेक नागरिकांनी यामध्ये प्राण गमावले आहेत, तर काहींना कायमचे अपंगत्व आले आहे. रस्त्याच्या आड येणारे झाडे व गरीब नागरिकांची घरे तात्काळ हटवली जातात, मात्र रस्त्याच्या मध्यभागी असलेले खांब व रोहित्रांना हलवले जात नाही. या खांबांमुळे शाळकरी मुले, तरुण, व सामान्य नागरिकांना मोठा धोका निर्माण झाला असून भविष्यातही गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे नमूद करून शहराच्या विकासाच्या नावाखाली प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांचे जीव संकटात आले आहेत. विद्युत खांब आणि रोहित्र योग्य ठिकाणी हलवून नागरिकांसाठी सुरक्षित रस्त्यांची निर्मिती करणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. ३० दिवसांच्या आत विद्युत खांब व रोहित्र रस्त्याच्या बाजूला न हलविण्यास भविष्यातील अपघातांसाठी महावितरणचे मुख्य अभियंता आणि महापालिका आयुक्तांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याचा इशारा ॲड. बिल्होरे यांनी दिला आहे. शहरवासीयांनी या विषयावर जागरूक राहून प्रशासनाला कारवाईस भाग पाडावे, असे आवाहनही ॲड. बिल्होरे यांनी केले आहे.

### शिक्षकांचे सक्षमीकरण ...

विषय उपक्रम राबविले पाहिजे. म्हणून राज्याच्या शिक्षण संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्यामार्फत राज्यातील शिक्षकांच्या प्रशिक्षणाच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. या सर्व शिक्षकांना प्रशिक्षित करण्यासाठी राज्यस्तरावर तज्ञ मार्गदर्शकांचे पॅनल तयार करण्यात आले असून जालना जिल्ह्यातून १० जणांचे तज्ञ मार्गदर्शकांचे पॅनल तयार करण्यात आले आहे त्यांच्या नुकत्याच नियुक्त्या करण्यात आले आहे. या पॅनलमध्ये डॉक्टर राजेंद्र कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली, डॉक्टर श्रीहरी दराडे यांच्या नेतृत्वात श्रीमती भालेराव सुजाता, उपप्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख, डॉक्टर आनंदराव जाधव, डॉक्टर शिवनंदा मेहत्रे, हरिदास निकम, डॉक्टर करुणा हिवाळे, गणेश खरात, विवेक कुलकर्णी, प्रदीप घाटेशाही, यांची जालना जिल्ह्यातून तज्ञ मार्गदर्शक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. हे दहा जणांचे पथक राज्यस्तरावर प्रशिक्षण घेऊन जिल्ह्यातील निवडक प्रशिक्षकांना प्रशिक्षित करणार आहेत. राज्यस्तरावरचे प्रशिक्षण दिनांक २० जानेवारी ते २४ जानेवारी पर्यंत पुणे येथे शैक्षणिक संशोधन परिषद पुणे येथे होणार आहे. या प्रशिक्षणामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, राज्य शैक्षणिक आराखडा २०२३, राज्य शालेय शिक्षण अभ्यासक्रम आराखडा २०२४, क्षमता आधारित मूल्यांकन - संकल्पना आणि कार्यनीती, क्षमता आधारित अध्ययन अध्यापन प्रक्रिया, क्षमताधारित प्रश्न निर्मिती, उच्च विचार प्रवर्तक प्रश्न, अध्ययन निष्पत्ती नुसार प्रश्न निर्मिती, संकल्पना, स्तरनिहाय स्वरूप, विचारमंथन होऊन प्रशिक्षण घेणार आहेत. या सर्व आधारावर राज्यातील शिक्षकांना मग ते प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक सर्व शिक्षकांना प्रशिक्षित करावयाचे आहे. त्यांच्या क्षमता आणि सक्षमीकरण करावयाचे आहे. याचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे. जिल्हास्तरावरील प्रशिक्षणाची तारीख ३ फेब्रुवारी ते सात फेब्रुवारी अशी आहे. त्याचबरोबर तालुका प्रशिक्षण १० फेब्रुवारी ते ८ मार्च या कालावधीत घेण्यात येणार आहे. या सर्व क्षेत्रांमध्ये पर्यवेक्षण यंत्रणा जी असेल त्यांच्यासाठी दोन दिवसाचे प्रशिक्षण सुद्धा होणार आहे. हा उपक्रम स्टार्स आणि तमागर शिक्षा २०२४ २५ अंतर्गत उपक्रम राबविण्यात येत आहे.

### राज्य लोकसेवा ...

प्रमुख उपस्थिती होती.

आयुक्त डॉ. जाधव म्हणाले की, आपले ब्रिदवाक्य जनतेची सेवा हेच आमचे कर्तव्य असले पाहिजे आणि याच भावनेतून महाराष्ट्रातील जनतेला भ्रमणध्वनीद्वारे अर्ज केल्यास त्यांना डिजीटल प्रमाणपत्रही तात्काळ मिळायला हवे याच दिशेने प्रशासनाने सकारात्मक दृष्टीकोनातून वाटचाल करायला हवी. नागरिक कार्यालयात आल्यानंतर त्यांना कार्यालय स्वच्छ दिसून त्यांचे मन प्रसन्न व्हावे अशी आसन व्यवस्था कार्यालयाने करायला पाहिजे. आपले सरकार व्हर्जन-२ ला मान्यता मिळाली असून विहीत कालमर्यादेत सेवा पुरविण्यासाठी पावले उचलली गेली आहेत. जिल्ह्यातील सर्व आपले सरकार सेवा केंद्रावर तक्रार पेटी ठेवण्यात यावी. आपले सरकार केंद्रातून अर्ज सादर करतावेळी केंद्र चालकाने स्वत:चा किंवा इतर भ्रमणध्वनी अर्ज भरताना न टाकता केवळ अर्जदारांचा भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करावा जेणेकरुन त्रुटी पुर्ततेसाठी संबंधित अर्जदाराला योग्य ती माहिती वेळेत प्राप्त होईल. राज्य शासनाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय विभाग तसेच प्राधिकरणे यांच्या ९६९ सेवा अधिसूचित करुन त्या सेवांचा लाभ ऑनलाईन स्वरुपात नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. आपले सरकार केंद्रामधुन विविध सेवांसाठी अर्ज आणि अपील दोन्ही करता येतात. हा कायदा नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त असून, या कायद्याची माहिती जनतेला व्हावी यासाठी प्रत्येकाने आपल्या कार्यालयाच्या दर्शनी भागात या कायद्याच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सेवांची व त्यासाठीच्या कालमर्यादेची माहिती डकवणे बंधनकारक आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीने प्रशासन अधिक गतिमान आणि पारदर्शक होण्यास मदत होणार आहे. विहित कालमर्यादेत काम न करणाऱ्या अधिकाऱ्यासाठी पाचशे रुपयांपासून ते पाच हजार रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद या अधिनियमात करण्यात आली असल्याचे ही डॉ. जाधव यांनी यावेळी सांगितले. असे सांगून त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ अंतर्गत कायद्याची सविस्तर माहिती संगणकीय सादरीकरणाद्वारे उपलब्ध करुन दिली. या बैठकीस संबंधित यंत्रणेचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या माध्यमातून जिल्ह्यात जास्तीत-जास्त सेवांचा लाभ देण्यासाठी सध्या अधिसूचित असलेल्या व नव्याने अधिसूचित करण्यात येणाऱ्या सेवा अधिसूचित करुन जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येईल. तसेच हा कायदा जास्तीत-जास्त नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व विभागप्रमुखांनी वेळेत कार्यवाही करावी. असेही जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी बैठकीत निर्देश दिले. यावेळी बैठकीस विविध विभाग प्रमुखांची उपस्थिती होती.

# उर्वरित ५६ गावात येत्या २ महिन्यात पाणी न पोहोचल्यास कंत्राटदार व प्रशासनाच्या विरोधात आक्रमक कारवाई करणार

## आमदार लोणीकरांचा कंत्राटदार मुख्य अभियंत्यांसह अधिकाऱ्यांना अल्टिमेटम

**परतुर । प्रतिनिधी -** परतूर विधानसभा मतदारसंघातील परतुर तालुका नेर शेवली भागातील १७३ गाव वॉटर ग्रीड मधील ५६ गावांना पाणी अद्यापही पोहोचले नसून, प्रशासनाने, गुत्तेदारासोबत हात मिळवणे करत, काम पूर्ण झाल्याचे लिहून दिले मात्र या संदर्भात आपण ग्राम पातळीवरील प्रत्येक ग्रामपंचायत च्या सरपंच ग्राम सेवक यांच्यामार्फत गटविकास अधिकारी यांना वास्तवदर्शी अहवाल मांडण्यास सांगितले होते प्रत्येक गावातून आलेल्या अहवालानुसार अजूनही अनेक गावांमध्ये पाणीच पोहोचले नसल्याने येत्या ०२ महिन्यात उर्वरित गावांमध्ये शुद्ध पाणी पोहोचवण्याची जबाबदारी कंत्राटदार व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रशासनाची असल्याचे सांगतानाच कंत्राटदार कंपनी व मुख्य अभियंता अधीक्षक अभियंता कार्यकारी अभियंता उपअभियंता यांना धारेवर धरत पुढील ०२ महिन्याचा अल्टिमेटम दिला असल्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले

ते नागापूर तालुका परतुर येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या कार्यालयात संपन्न झालेल्या बैठकी प्रसंगी बोलत होते

पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या बैठकीमध्ये, पुढील दोन महिन्यांचा अवधी कंत्राटदारास देण्यात आलेला असून दोन महिन्यानंतर ही काम पूर्ण न केल्यास चौकशी समितीच्या मार्फत चौकशी केली जाणार असल्याचे आमदार लोणीकर यांनी यावेळी बोलताना सांगितले

पुढे बोलताना ते म्हणाले की, अधिकाऱ्यांनी खोटारडेपणा न करता, वास्तवदर्शी काम कंत्राटदार कंपनीकडून करून घ्याव जेणेकरून उर्वरित सर्वच गावांचा पाणीपुरवठा सुरू होईल

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाणी गावापर्यंत पोहोचलेले नसतानाही टाकीला जोडलेले नसतानाही पाणी पोहोचले च्या नोंदी केल्या या नोंदी दादांत खोट्या असून यावरून प्रशासनातील उपअभियंता अभियंता यांना प्रचंड धारेवर धरत प्रसंगी कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल याचे भान ठेवावे असेही ठणकावले

पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की, गटविकास अधिकारी सरपंच ग्रामसेवक या यंत्रणेने गावागावात किती पाणी पोहोचले आहे कोणत्या गावातील काम पूर्ण झाले आहे यासंदर्भातला लेखी अहवाल दर आठवड्याला सादर करावा त्याचबरोबर ज्या गावांना पाणीपुरवठा नियमित होत आहे अशा गावातील पाणीपट्टी वसुलीला प्राधान्य द्यावे असेही यावेळी बोलताना त्यांनी सांगितले

अधिकाऱ्यांनी पाईपलाईनची हायड्रोलिक टेस्ट न करताच अनेक गावांना पाणी सोडण्याचा प्रयत्न केला मात्र त्यामुळे अनेक ठिकाणची पाईपलाईन लिकेज झाली आहे ही संपूर्ण जबाबदारी प्रशासन व कंत्राटदाराची असून त्यांच्याकडून झालेल्या चुका दुरुस्त करून त्यांनी तात्काळ ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारचे प्रश्न निर्माण झालेले आहेत ते निकाली काढावे

पुढे बोलताना ते म्हणाले की, ही योजना कार्यान्वित करण्यासाठी आपण मंत्री असताना इजराइल श्रीलंका ऑस्ट्रेलिया आधी देशांना भेट देऊन तात्कालीन अर्थमंत्री सुधीर भाऊ मुनगंटीवार मी व माझ्यासह महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे अधिकाऱ्यांची टीम घेऊन आपण या तीनही देशातील विविध वॉटर ग्रेड योजनांचा अभ्यास केला त्याच धर्तीवर पायलेट प्रोजेक्ट म्हणून परतुर विधानसभा मतदारसंघांमध्ये ही योजना राबविण्यात आली त्यामुळे ही योजना पूर्ण करून संपूर्ण १७३ गावांना पाणी पोहोचवण्याची जबाबदारी कंत्राटदार कंपनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे अधिकारी, यांचे असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले. यावेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकाऱ्यांच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे, कार्यकारी अभियंता अजित सिंग चव्हाण, यांत्रिकी विभागाचे कार्यकारी अभियंता तुषार टेकवडे, रमेश गाडी उपविभागीय अभियंता एम बी गायकवाड प गटविकास अधिकारी राजेंद्र तांगडे , जालना गटविकास अधिकारी संदीप पवार,

भाजपा परतुर तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे जिल्हा सरचिटणीस रमेश भापकर, संपत टकले अशोकराव बरकुले, सुरेश सोळंके दिगंबर मुजमुले, शिवाजी पाईकराव, बंडू मानवतकर, विकास पालवे, यांच्यासह गावागावातून आलेले सरपंच ग्रामसेवक यांची उपस्थिती होती



# लायन्स क्लबतर्फे मोफत गुडघे व हाडांची ठिसूळता शिबिरात ८६ रुग्णांची तपासणी




**जालना । प्रतिनिधी -** मकर संक्रातीचे औचित्य साधून लायन्स क्लब ऑफ जालना आणि विवेकानंद हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी ( ता.१४ ) पार पडलेल्या मोफत गुडघेदुखी, हाडांची ठिसूळता तपासणी शिबिर शिबिरात अंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ञ गुडघे, क्रीडा सर्जन ऑर्थोपेडिक, सल्लागार डॉ. सिध्दांत गोयल यांनी तपासणी करून ८६ रुग्णांना गुडघ्याच्या आजाराविषयी मार्गदर्शन केले.

वाढत्या वयाबरोबर कॅल्शियमच्या कमतरतेमुळे हाडांची ठिसूळता, हात, पाय व गुडघ्यांचे आजार उद्भवतात. हे लक्षात घेऊन विवेकानंद हॉस्पिटल येथे सदर शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात यु.के.स्वित्झर्लंड, जपान,जर्मनी येथे गुडघे, हाडांबाबत उच्च शिक्षणासह वैद्यकीय सेवा देऊन सध्या छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत असलेले डॉ. सिद्धांत गोयल यांनी तपासणी करून मार्गदर्शन केले.

याप्रसंगी लायन्स क्लबच्या अध्यक्ष जयश्री लड्ढा, सचिव मंजू श्रीमाली, सल्लागार अतुल लड्ढा, जयप्रकाश श्रीमाली,

कोषाध्यक्ष कल्पना बियाणी, प्रकल्प प्रमुख कमलाकर मोरे व जगदीश भुतडा,

विवेकानंद हॉस्पिटलचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. राजकुमार सचदेव, संचालक डॉ. श्रीमंत मिसाळ, डॉ.चारुदत्त हवलदार, डॉ. चारुस्मिता हवलदार, डॉ. अनिल कायंदे, डॉ. पूजा कायंदे, डॉ. माधुरी पाकणीकर

वैद्यकीय अधीक्षक डॉ. सतीश गोयल, प्रशासकीय अधिकारी शशीराज केंढे, व्यवस्थापक किशोर आघाम आदी उपस्थित होते. डॉ. चारुदत्त हवालदार यांनी महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेबद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले.

# रेल्वेच्या विकास जालन्याचा विकास - भास्कर आंबेकर

**जालना । प्रतिनिधी -** येथील रेल्वे स्टेशन समोर टिपू सुलतान चौक येथे गुरुवार (दि १६) रोजी जालना रेल्वे संघर्ष समितीतर्फे जालना जळगाव -जालना खामगाव व जालना बीड ,संभाजीनगर ते परभणी दुहेरीकरण व इतर रेल्वे विषयी धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले होते या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती शिवसेना जिल्हाप्रमुख भास्कर आंबेकर यांनी जालना रेल्वेला भरपूर जमीन असून व क्रीडा मैदाना असून त्याचा उपयोग विकासाच्या कामाने करावे जालना जळगाव व जालना खामगाव हे मंजूर झालेली रेल्वे लाईन ला केंद्रशासनाने या बजेटमध्ये २०२५ च्या निधी दिली पाहिजे जालना हे भारताचे मध्यभागी असून उत्तर दक्षिण पूर्व पश्चिम रेल्वे जोडण्यासाठी मनमाड पेक्षा मोठा जंक्शन होईल असे आंदोलनाच्या वेळी मार्गदर्शन केले व्यापारी महासंघाचे विनीत सहानी यांनी जालना मोठे जंक्शन झाले तर उद्योग,व्यापार मध्ये भक्कम वाढेल अशी ग्वाही दिली या कार्यक्रमाचे फिरोज अली मौलाना यांनी रेल्वे संघर्ष समितीचे कार्य व यशमोलाचे आहे ,असा उल्लेख केला असेचे आंदोलन चालले तर जालन्याची रेल्वेच्या विकास व नागरिकांना सवलत मिळेल व ज्येष्ठ नागरिक पत्रकार, खेळाडू यांची पूर्वीप्रमाणे सवलत सुविधा सुरू करावी असे ही घोषणा देण्यात आली या आंदोलनामध्ये रेल्वे संघर्ष समितीचे सचिव अशोक मिश्रा सत्कार मामा डॉक्टर राधेश्याम जयस्वाल धर्मा खिल्लारे ,डॉक्टर केदार करवा ,गोपाल भु रेवाल ,सुरेश सद्गुरु श्रीकांत पांगारकर ,दिनकर घेवंदे ,ताज अहमद खान सर, मोमीन अन्सारी नितीन चौधरी ,एडवोकेट हरिश्चंद्र चौधरी पी .जे . चांद सर अभय यादव, यांची उपस्थिती होती.




## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस २० ते २४ दावोसमध्ये

**मुंबई -** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे येत्या २० ते २४ जानेवारी या काळात दावोसमध्ये वर्ल्ड इनॉकॉनिक फोरममध्ये सहभागी होणार आहेत. यासाठी १९ तारखेला पहाटे ते मुंबईतून रवाना होणार आहेत. सर्वाधिक परकीय गुंतवणूक आकर्षित करणारा आणि आकांक्षांनी परिपूर्ण महाराष्ट्रात आणखी गुंतवणूक आणण्याच्या हेतूने त्यांचा हा दौरा अत्यंत महत्त्वपूर्ण असणार आहे. यापूर्वी देवेंद्र फडणवीस हे त्यांच्या पहिल्या कार्यकाळात ३ वेळा दावोसमध्ये वर्ल्ड इनॉकॉनिक फोरममध्ये सहभागी झाले होते. औद्योगिक विकासात पाचव्या क्रमांकावरुन महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आला होता.

# डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळ प्रेरणा देणारी - ॲड. चव्हाण




**मंठा । प्रतिनिधी -** नामांतर चळवळीचे साक्षीदार ड चव्हाण प्रा.डॉ.प्रशांतकुमार वनंजे परिवर्तन सोसायटी अंतर्गत महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य महाविद्यालय येथे रोजी मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळ बद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ॲड. ब्रम्हानंद चव्हाण म्हणाले की,१४ जानेवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हा नामांतर दिवस पण या नामांतराच्या दिवसाची वाट पाहण्यासाठी आंबेडकरवादी जनतेला १७ वर्ष संघर्ष करावा लागला. शिक्षण हे मागासवर्गीय समाजासाठी अन्य कोणत्याही भौतिक लाभांपेक्षाही सर्वाधिक महत्त्वाचा लाभ आहे. दबलेल्यानी पिचलेल्या मागासवर्गीय समाजाने शिक्षण घेतले तरच त्यांचा उत्कर्ष आहे व तेही सर्वाच्च शिक्षण, उच्च शिक्षण घेतले तरच ते प्रगतीपथावर जाऊ शकतात. अन्यथा त्यांचे जीवन असुरक्षितनी कष्टप्रदच राहील. उच्चशिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. उच्चशिक्षण हे बुद्धिजीवी वर्गाचे क्षेत्र असले तरी या क्षेत्रात गरीब व दुर्बल घटकातल्या माणसास संधी मिळायला हवी असे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्पष्ट मत होते. हजारो वर्षापासून शिक्षणापासून वंचित असलेल्या आणि निजामाच्या राजवटीत जे मागासलेपणाच्या यातना भोगत होते त्यांना शिक्षणाची संधी मिळवून देण्यासाठी १९५०ला औरंगाबाद येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. मिलिंद महाविद्यालयाच्या पायाभरणी प्रसंगी श्री गोविंदभाई श्रॉफ आणि माणिकचंद पहाडिया यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ बाबासाहेबांच्या भेटीला आले होते. बाबासाहेबांशी बोलताना त्या शिष्टमंडळाने आपण हे जे महाविद्यालय सुरू करीत आहोत आहात ते या ठिकाणी चालेल का? असा प्रश्न केला. त्यावेळी बाबासाहेब उद्गारले येथे फक्त एक महाविद्यालय उभारून चालणार नाही तर येथे एक विद्यापीठ उभारले जावे अशी माझी तीव्र इच्छा होती. समयोचित मार्गदर्शन प्रा.डॉ. राजकूमार मस्के यांनी केले,तर प्रा.डॉ प्रशांत कुमार वनंजे यांनी ड ब्रम्हानंद चव्हाण हे नामांतर चळवळीचे साक्षीदार असल्याचे सांगितले .पुढे बोलताना ड चव्हाण म्हणाले की,मराठवाड्यात शिक्षणाची गंगा महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आणली, औरंगाबाद शहरात मिलिंद महाविद्यालयाची स्थापना करून, शैक्षणिक दृष्ट्या अप्रगत असलेल्या मराठवाड्याला प्रगत करण्याचं काम महामानवाने केले.आणि त्याच मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेबांचे नाव देण्याचा मुद्दा उपस्थित झाला तेव्हा, अनंत भालेराव, गोवींदभाई श्रोफ या अविचारी माणसांनी विरोध केला, त्यांच्या या विरोधामुळे महाराष्ट्रातील तमाम आंबेडकरी जनता पेटून उठली व नामांतराची मागणी जोर धरू लागली, ठीक ठिकाणी मोर्चे, आंदोलने होवू लागले, नामांतराला विरोध म्हणून जातियवादी लोकांनी दलितांवर अन्याय, अत्याचार करण्यास सुरुवात केली.सोळा वर्षाच्या लढाईनंतर औरंगाबादेतील मराठवाडा विद्यापीठाला १४ जानेवारी १९९४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असे नाव देण्यात आले.नामांतराची अधिकृत घोषणा तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी केली.३१ वाघ डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर दिन चिरायू होत असताना नामांतराचे नामविस्तार झाले. यावेळी प्रा डॉ मधू खोब्रागडे, प्रा. डॉ. हिवराळे, प्रा.डॉ. गवळी, डॉ पी.टी.शिंदे यांची उपस्थिती होती विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी सर्व माहिती शांतपणे ऐकून घे जण त्या इतिहासाचे आपण साक्षीदार आहोत असे भासत होते.

# वीज वितरण कंपनीने रस्त्यालगत उभे केलेले विद्युत खांब तात्काळ हटवा

## सा. बा. विभाग उपअभियंताकडे संभाजी ब्रिगेडची तक्रार



**मंठा । प्रतिनिधी -** तालुक्यातील रस्त्यालग वीज वितरण कंपनीने विद्युत खांब उभे करण्याचे काम चालू आहे ते काम सार्वजनिक बांधकाम विभाग व वीज वितरण कंपनीचे नियम डावलून ठेकेदाराने रस्त्यालगत साईड पंख्यावर उभे केलेले खांब तात्काळ काढा अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने सा. बा. विभागाच्या उपाभियांत्याकडे दि. १५जानेवारी रोजी निवेदणाद्वारे केली आहे नसता लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात करण्यात येईल अशा ईशारा देण्यात आला आहे.

निवेदनात नमुद केले की रस्त्यालागत विद्युत खांब रोवलेली असून व त्या खांबांमुळे उपघाताचा धोका निर्माण झाला आहे.भविष्यात रोड रुंदीकरण काम झाल्यास ते खांब रस्त्यावर येणार आहेत त्यामुळे अपघाता ची शक्यता नाकारता येत नाही त्या रस्त्यालगत खांब व तारमुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झालेला आहे तरी ते काम तात्काळ थांबवून उभे केलेले खांब काढून योग्य त्या अंतरावर रोवून उभे करण्यात यावे अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात येत आहे.

शासनाच्या दिनांक ९ मार्च २००१ च्या शासन निर्णयानुसार इमारत रेषा व नियंत्रण रेषा याचे अंतर राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग व प्रमुख राज्य मार्ग प्रमुख जिल्हा मार्ग, इतर जिल्हा मार्ग, ग्रामीण मार्ग यासाठी कमाल व किमान अंतर हे रस्त्याच्या मध्यापासून साठ मीटर ते पंचवीस मीटर पंधरा मीटर याप्रमाणे ठरवण्यात आलेले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्याअंतर्गत येणाऱ्या मंठा तालुक्यामध्ये अनेक रस्त्यालागत वीज वितरण कंपनीचे पोल उभे करण्याचे काम व त्यावर तारा ओढण्याचे काम नियमांना डावलून सुरू आहे मात्र सदर काम करताना वीज वितरण कंपनी व कंपनीचे ठेकेदार हे शासनाच्या संदर्भीय आदेशाची सर्रास पायमल्ली करताना दिसून येत आहे. शासनाचे सर्व नियम धाब्यावर बसून हे कामे सुरू आहेत. रस्त्याच्या कडेला पोल उभे करताना रस्त्याच्या पंख्यावर किंवा पंख्या पासून पाच ते सात फूट अंतरावर पोल उभे केले जात आहेत. सदर पोल उभे केल्यामुळे रस्त्यावर वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. तसेच सदर पोल अवैधरित्या उभे केले असल्यामुळे या ठिकाणी अपघाताचे व अपघातामध्ये सामान्य वाहनधारकांचे मृत्यूचे प्रमाण वाढलेले आहे. भविष्यात याच रस्त्यांच्या रुंदीकरणाची कामे करायचे झाल्यास वीज वितरण कंपनीचे अधिकारी हेच पोल काढण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अंदाजपत्रक सादर करून पैशाची मागणी करतात. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी या कामाची पाहणी करून तात्काळ सूचना देऊन रस्त्याच्या कडेला अवैधरित्या उभे केलेले व धोकादायक पोल काढण्याचे आदेशीत करावे नसता आपल्या कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल अशा ईशारा निवेदनाच्या शेवटी देण्यात आला आहे निवेदनावर बाळासाहेब खवणे, आसाराम झोल, ज्ञानदेव काकडे,एकनाथ जाधव, परमेश्वर मगर,शिवाजी जाधव यांच्या सह्या आहेत.

# विवेकानंद हॉस्पिटलमध्ये गर्भाशयातील गाठीवर गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी

**जालना । प्रतिनिधी -** चाळीसगाव येथील ४० वर्षीय महिलेच्या गर्भाशयातील १६ बाय १७ सें. मी. आकाराच्या गाठीवर येथील विवेकानंद हॉस्पिटलमध्ये यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. याबद्दल आनंदाश्रूने या महिलेने आभार व्यक्त केले.



ब्रॉड लिगामेंट फायब्रॉइडमुळे ही महिला दोन वर्षांपासून अतिरक्तस्राव आणि तीव्र पोटदुखीचा त्रास सहन करत होती. महाराष्ट्रातील काही नामांकित रुग्णालयांमध्ये तपासणीनंतरही रुग्णास शस्त्रक्रियेसाठी योग्य मार्गदर्शन मिळाले नाही. काही ठिकाणी शस्त्रक्रिया जीवावर बेतण्याची भीती व्यक्त करण्यात आली. या कठीण प्रसंगात सदर महिलेला घेऊन नातेवाईक विवेकानंद हॉस्पिटलमध्ये आले आणि स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. अनिल कायंदे यांना भेटल्यानंतर रुग्ण व तिच्या कुटुंबियांना योग्य समुपदेशन मिळाले. डॉ. कायंदे यांनी फायब्रॉइड्सची लक्षणे, त्यांची कारणे आणि उपचार पद्धतीबद्दल रुग्णाला सखोल माहिती दिली. दि. २ जानेवारी रोजी रुग्णाला हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात येऊन डॉ. अनिल कायंदे यांच्या नेतृत्वाखालील तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली. या प्रक्रियेत शल्यचिकित्सक डॉ. श्रीमंत मिसाळ, भूलतज्ज्ञ डॉ. पुरुषोत्तम सोमानी तसेच रेडिओलॉजिस्ट डॉ. चारूदत्त हवालदार यांचे सहकार्य लाभले.

रुग्णाला ८ जानेवारी रोजी डिस्चार्ज देण्यात आला. ही महिला १६ जानेवारी रोजी टाके काढण्यासाठी हॉस्पिटलला आल्यानंतर डॉ. अनिल कायंदे आणि त्यांच्या टीमचे आभार मानताना तिच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.

शस्त्रक्रिया करणारे सर्जन डॉ. श्रीमंत मिसाळ, भूलतज्ञ डॉ. पुरुषोत्तम सोमानी, स्त्रीरोग तज्ञ डॉ. चारूस्मिता हवालदार, डॉ. माधुरी पाकणीकर, रेडिओलॉजिस्ट डॉ. चारूदत्त हवालदार, सहाय्यक वैद्यकीय अधिकारी डॉ. पल्लवी पवार, डॉ. आकांक्षा शेलगावकर, डॉ अश्विनी येळवंडे, परिचारिका नीलू सिंग, मंजू पाटोळे, सुरेखा लष्कर, शोभा पटेकर, चंदा जाधव, श्रीमती फातेमा, शाईन शेख आदी कर्मचाऱ्यांचे या महिलेने आभार मानले.

या यशस्वी शस्त्रक्रियेबद्दल डॉ. अनिल कायंदे यांचे हॉस्पिटलचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. राजकुमार सचदेव, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सतीश गोयल तसेच डॉ. पूजा कायंदे यांनी अभिनंदन केले.

## गोर-गरीबांच्या वस्त्यांमधील नागरी सुविधांसाठी मनपा प्रशासनाकडे पाठपुरावा करणार - भास्कर अंबेकर

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील गोर-गरीब राहत असलेल्या वस्त्यांमधील नागरी सुविधांसाठी महानगर पालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्कर अंबेकर यांनी सांगितले.

जालना शहरातील रेल्वेस्टेशन जवळील साहित्यरत्न आण्णाभाऊ साठेनगर या वस्तीत जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांच्या हस्ते गट्टू बसविण्याच्या कामाचा शुक्रवार १७ जानेवारी रोजी शुभारंभ करण्यात आला.

यावेळी बोलतांना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, जालना शहरात ४० ते ५० झोपडपट्टया आहेत. त्यातून अनेक गोर-गरीब श्रमजीवी नागरीक वास्तव्य करतात. त्यांचा अगदीच जगण्याचा संघर्ष नियमित सुरू असतो. त्यांच्या वस्त्यांत अस्वच्छता, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, कमी जागेमुळे सार्वजनिक शौचालये, शिक्षण अशा अनेक प्रश्नांचा ते दैनंदिन सामना करतात. प्रभावहीन असल्यामुळे प्रशासनाचे त्यांच्याकडे अक्षम्य दुर्लक्ष होते.



शहरातील इतर वस्त्यांबरोबरच सर्व झोपडपट्ट्यांमध्ये सुद्धा प्रशासनाने लक्ष देऊन त्यांचे नागरी प्रश्न सोडवावेत यासाठी महानगर पालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे शिवसेना जिल्हाप्रमुख भास्कर अंबेकर यांनी सांगितले. यावेळी मातंग समाजाचे नेते रविकांत जगधने, विनोद आठवे, गोविंद आठवे यांच्यासह अश्विन अंबेकर, गणेश तरासे, मदनराव खरात, परमेश्वर वाघमारे, बंडू आगळे, संजय अंभोरे, आदींची यावेळी उपस्थिती होती.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.